किंमत : १०० रूपये, पाने : १४४+४
वर्ष : ३, अंक : २५-२६, एप्रिल-मे २०१६

# ॲग्रोवर्ल्ड

ध्यास... कृषी व ग्रामविकासाचा

## दूध व्यवस्थापन विशेष

- पाणी टंचाईतही केला दुग्ध व्यवसाय यशस्वी
- गायींसाठी दर्जेदार आहारामुळे भरघोस दूध उत्पादन
- दुष्काळग्रस्त भागात दुधाचा प्रवाह
- पशुधन एकत्रित सांभाळण्यासाठी 'ॲनिमल होस्टेल'
- महिलेने केला दुग्ध व्यवसाय सक्षम

द्वितीय वर्धापनदिन विशेषांक

## करारशेती विशेष

- करारशेतीतून मिळाली उत्पन्नाची शाश्वती
- बीजोत्पादक शेतकऱ्यांचे तपोवन
- पांढऱ्या कांद्याच्या करारशेतीतून समृध्दी
- पडीक जमिनीत सुबाभळीची करारशेती
- करारशेतीत भेंडी, मिरचीची निर्यातक्षम उत्पादन





अनिल शिंदे,
जळगाव



# पांढऱ्या कांद्याच्या करारशेतीतून समृद्धी

## जैन उद्योग समूहाचा पुढाकार, पाच हजार शेतकरी सहभागी

**जैन उद्योग समूहाच्या कांदा प्रक्रिया प्रकल्पाच्या माध्यमातून पांढऱ्या कांद्यापासून निर्यात योग्य काप व पावडर बनविली जाते. यासाठी गुणवत्तापूर्ण पांढरा कांदा आवश्यक असतो. पांढऱ्या कांद्याच्या उत्पादनासाठी कंपनीतर्फे करारशेतीची संकल्पना राबविण्यात येते. दरवर्षी खरीप व रब्बी हंगाम मिळून जवळपास अकरा हजार एकरावर पांढऱ्या कांद्याची लागवड करण्यात येते. यात जवळपास पाच हजार शेतकरी सहभागी होतात. या करारशेतीमुळे शेतकऱ्यांना उत्पन्नाची हमी निर्माण झाली आहे.**

सुरुवातीला पांढऱ्या कांद्याचे करारशेतीतून उत्पादनाबाबतची संकल्पना शेतकऱ्यांना सांगितली तेव्हा अनेक शेतकरी शाशंक होते. मात्र, ही संकल्पना शेतकऱ्यांना पटल्यानंतर चांगला प्रतिसाद मिळाला. वर्ष २००८ मध्ये जैन उद्योग समूह व इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन (आंतरराष्ट्रीय वित्त आयोग) यांनी कांदा पिकाच्या पुरवठा साखळीबाबत सविस्तर अभ्यास केला. यामध्ये अन्न उत्पादनाच्या मूळ स्त्रोतांचा मागोवा व चांगल्या शेतीविषयक पद्धतीची अंमलबजावणी या मुद्यांना प्राधान्य देण्यात आले. या अभ्यासामध्ये असे दिसून आले, की पुरवठादार चांगल्या शेतीविषयक पद्धतीची अंमलबजावणी नियमितपणे करीत नाही. उत्पादन वाढविण्यासाठी, अनावश्यक खर्च कमी करण्यासाठी, नैसर्गिक स्त्रोतांचा योग्य व परिपूर्ण वापर करताना त्याचे पुनर्निर्माण, संरक्षण करण्यासाठी चांगल्या शेतीविषयक पद्धतीचे मापदंडक असणे जरुरीचे असल्याचे या अभ्यासाअंती त्यांच्या लक्षात आले. या पार्श्वभूमीवर 'जैन इरिगेशन सिस्टिम्स'ने कांदा पिकाच्या लागवडीपासून ते थेट उत्पादन, प्रक्रिया निर्यातपर्यंतची मजल मारली. 'जैन'चे गॅप मापदंडक हे आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यताप्राप्त ग्लोबल गॅप आणि सस्टेनेबल अॅग्रीकल्चर कोड या चांगल्या शेतीपद्धतीच्या मापदंडकावर आधारित असून कमी खर्चिक, कमी वेळात अंमलबजावणी करता येण्यायोग्य व माल पुरवठादार साखळीमध्ये पदार्थ सुरक्षा ठेवण्यानुरूप आहे. या मापदंडकाची अंमलबजावणी २००९ पासून कांदा पिकांमध्ये करण्यात आली आहे. महाराष्ट्रात जळगाव, धुळे, नंदुरबार, बुलडाणा तसेच मध्य प्रदेशात बडवाणी व खंडवा आदी ठिकाणी याचा या मापदंडानुसार उत्पादन होत आहे.

### करारशेतीला चालना

'जैन' उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांनी १९६३ पासून कृषिपुरक उत्पादनांवर भर देऊन शेती आणि उच्च तंत्रज्ञान यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी काळाची गरज लक्षात घेत १९७८ मध्ये करारशेतीवर भर दिला. त्याकाळी त्यांचा पपेनचा व्यवसाय असल्याने करारशेतीतून पपईचे उत्पादन घेण्यात येत होते. पपई लागवड करणाऱ्या शेतकऱ्याला बीज दिले जात. लागवडीपासून ते काढणीपर्यंतचे सर्व मार्गदर्शन कंपनीतर्फे केले जायचे. पपईतून निघणाऱ्या चीकास (लॅटेक्स) हमीभाव दिला गेला. जवळपास ९ ते १० वर्षे करारशेतीतून पपई उत्पादन घेतले. याच धर्तीवर कांदा पिकात करारशेतीची संकल्पना पुढे आली.



## कांदा करारशेतीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन

'जैन इरिगेशन सिस्टिम्स'चे संस्थापक आदरणीय भवरलालजी जैन यांच्या संकल्पनेतून कांदा करारशेती ही संकल्पना साकारली आहे. यात लागवडीपासून काढणीपर्यंतचे मार्गदर्शन कंपनीतर्फे करण्यात येते. विशेष म्हणजे बाजारभाव कमी असला तरी ठरल्यानुसार शेतकऱ्यांना हमीभाव दिला जातो. बाजारभाव अधिक असल्यास त्याप्रमाणेच देण्यात येतो. जागतिक बाजारपेठेत असलेली स्पर्धा लक्षात घेता प्रक्रिया करण्यात येणारा माल अद्ययावत प्रमाणिकरणाच्या दृष्टिकोनातून गुणवत्ताक्षम असणे आवश्यक आहे. करारशेतीतून शेतकऱ्यांपर्यंत कांदा उत्पादनासाठी सर्व तंत्रज्ञान पोहोचवून त्यांच्याकडून हमीभावाने हा कच्चा माल घेऊन त्यावर प्रक्रिया करणे तसे आव्हानात्मक आहे, परंतु कांदा पावडर व कापच्या उत्पादनाची मोठी मागणी असल्याने उत्पादनक्षमता वाढविण्यावर कंपनीने अधिक भर दिला आहे.

– अशोक जैन, अध्यक्ष, जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., जळगाव



### शेतकरी जागृती कार्यक्रम

जळगाव, धुळे, नंदुरबार या जिल्ह्यात वर्ष २००१ पासून कांद्याच्या करारशेतीला सुरवात झाली. त्याकाळी शेतकऱ्यांना पांढऱ्या कांद्या उत्पादनाचे आकर्षण नव्हते. ही संकल्पना नवीनच असल्याने सुरुवातीला जनजागृतीवर अधिक भर देण्यात आला. गावागावात बैठका घेऊन करारशेतीबद्दल माहिती दिली गेली. त्यावेळी प्रती किलो ३ रुपये हमीभाव देण्याची योजना होती. शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर मार्गदर्शन मिळावे यासाठी शेतीची आवड असणाऱ्या गावातील तरुणांची नियुक्ती केली. शेतकऱ्यांना अभ्यासपूर्ण मार्गदर्शन व्हावे यासाठी या तरुणांना कंपनीतर्फे तीन महिन्याचे प्रशिक्षण देखील देण्यात आले. अधिक उत्पादनासाठी घ्यावयाची काळजी, फवारणी, खतांची मात्रा, पाणी व्यवस्थापन, अत्याधुनिक तंत्रज्ञान अशा अनेक गोष्टींवर मार्गदर्शन केले. ठिकठिकाणी शेतकऱ्यांच्या शेतांवर प्रशिक्षण शिबिरांचे देखील आयोजन करण्यात आले.

### कांदा बियाण्याची निर्मिती

कांदा करारशेतीची संकल्पना अस्तित्वात येत असताना जैन हिल्स येथे प्रात्यक्षिक प्लॉट तयार करण्यात आले. येथील संशोधन केंद्राच्या माध्यमातून अधिक उत्पादन देणाऱ्या बियाण्याची निर्मिती केली. खरीप हंगामासाठी जेव्ही-५, रब्बी हंगामासाठी जेव्ही-१२ ही जात विकसित केली. सुरुवातीला कांद्याचे उत्पादन एकरी ५ टनापर्यंत होते, परंतू, ड्रीप, स्प्रिंकलर्स, मायक्रोस्प्रिंकलर्स, रेनपोर्ट अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सरासरी एकरी १० टनापर्यंत उत्पादन पोहोचले.

### कांदाबीज पेरणी यंत्र

कांद्यासारख्या पिकाची लागवड पारंपरिक पद्धतीने करण्यास किचकट असते, यासाठी शेतमजुरांची टंचाई, मजुरीचे वाढलेले दर, विजेचा खोळंबा, लहरी वातावरणामुळे रोपवाटिकेत खराब होणारी रोपे अशा अनेक समस्या असतात. या समस्यातून शेतकऱ्यांची सुटका व्हावी म्हणून 'जैन इरिगेशन'ने बैलजोडीवर चालणारे कांदा बियाणे पेरणी यंत्र विकसित केले. हे यंत्र उपयोगी असल्याचे सिद्ध झाल्याने शेतकऱ्यांकडून मागणी वाढली. या कांदा बियाणे पेरणी यंत्रामुळे एक शेतकरी अवघ्या दोन तासांत एक एकर क्षेत्रावर पेरणी करू शकतो. पेरणी केलेल्या कांदा बियाण्यातून तयार झालेल्या रोपांमध्ये समान अंतर राखले जाते. या पद्धतीमध्ये पारंपरिक पद्धतीपेक्षा एक महिना कमी कालावधीत कांदा काढणीस येतो.

### पाणी व्यवस्थापन

कांद्याची लागवड पारंपरिक सपाट वाफा आणि सरी वरंबा पद्धतीने करून मोकाट सिंचन पद्धतीचा अवलंब शेतकरी करतात. या पद्धतीने कांदा पिकाची वाढ समाधानकारक होत नाही व एकसारखेपणाही येत नाही. वरंब्याकडील कांदा मोठा होतो आणि पाणी मात्रा अधिक लागते. कांदा एकसारखा व चांगला कंद पोसण्यासाठी तसेच कमी पाण्यात चांगले पीक येण्यासाठी ठिबक सिंचन किंवा रेनपोर्ट स्प्रिंक्लरचा वापर केल्यास अधिक उत्पादन घेणे शक्य होते. याच धर्तीवर जैन उद्योग समूहाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून इनलाईन ठिबक सिंचन, रेनपोर्ट मिनी स्प्रिंकलर, रेनपोर्ट मायक्रोस्प्रिंकलरच्या माध्यमातून कमी पाण्यात भरघोस उत्पादन घेण्यात यश मिळवले आहे.

RNI NO. MAHMAR43951/13/1/2014-TC, Postal.JAL/342/2014-2016.


# आधुनिक शेतीचा मंत्र, जैन टिश्यूकल्चर तंत्र!

## जैन टिश्यूकल्चरची केळी, डाळींब अनं स्ट्रॉबेरी, म्हणजे एकराची लागवड करते चार एकराची बरोबरी !

**जैन टिश्यूकल्चर केळी**



**जैन टिश्यूकल्चर डाळींब**



**जैन टिश्यूकल्चर स्ट्रॉबेरी**



- जैन टिश्यूकल्चर तंत्रज्ञान गेल्या एकवीस वर्षापासून अव्वलस्थानी व शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरलेले तंत्र.
- जैन टिश्यूकल्चर तंत्रज्ञानात सातत्याने नाविन्यपूर्ण काम करून या तंत्रज्ञानास देशाच्या पातळीवर यशस्वी करण्यात मोलाचा वाटा!
- टिश्यूकल्चर सोबत पिक पद्धतीत बदल करावा लागतो, पिकानुसार नाविण्यपूर्ण असे उत्पादन तंत्रज्ञान विकसित केले.
- रोपांची शास्त्रोक्त निर्मिती, प्रायमरी व सेकंडरी हार्डनिंगचे स्वत:चे तंत्रज्ञान विकसित केले ते संपूर्ण जगभर मार्गदर्शक ठरले.
- रोपे निर्मितीपासून तर हार्डनिंग व वितरण यामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणला.
- जैन टिश्यूकल्चर तंत्रज्ञान देशातील शेतकऱ्यांच्या विश्वासाचे व खात्रीचे वाण म्हणून जगात अव्वल स्थान.
- केळी, डाळींब, स्ट्रॉबेरी, पेरू सारखी पिके व्यापारी तत्वावर उत्पादन करणारी देशातील एकमेव कंपनी.
- रोपे लागवडी नंतर वीस वर्षांचा अनुभवी कृषी सल्ला.
- कॉफी, आंबा, मोसंबी, ऊस यासारख्या अवघड पिकांमध्ये टिश्यूकल्चर चाचणी यशस्वी.
- जैन पिक लागवड तंत्रज्ञान निर्माण करून व वीस वर्षातील अनुभवातून शेतीला शाश्वत केले.
- जैन टिश्यूकल्चरमुळे बदलत्या हवामान व प्रतिकुल परिस्थितीत यशस्वी शेती करणे शक्य झाले.
- आजमितीस नाविण्यपूर्ण शेती म्हणजेच जैन टेक्नोलॉजी असे समीकरण झाले.
- टिश्यूकल्चर तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्याची आर्थिक भरभराट तर उत्पादन खर्चात कपात झाली.

**जैन तंत्रज्ञानाची ओढ-त्याला अनुभवाची जोड**

**शुद्ध बीजापोटी। फळे रसाळ गोमटी।।**

जैन टिश्यूकल्चर™
अधिक उत्पादन - अधिकाधिक नफा®

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना फणापारी, प्रशांकाधा भेव करी.®

जैन प्लास्टिक पार्क, पो.बॉ.७२, जळगांव - ४२५००१., फोन : ०२५७ - २२५८०११; फॅक्स: ०२५७- २२५८१११;
ई-मेल: jisl@jains.com वेबसाईट: www.jains.com

कार्यालये : जळगाव : ९४२२७७४९४३, ९४२२७७४९३१, अमरावती/अकोला/वाशिम : ९४०३०८०१३४, अहमदनगर : ९४२२७७३३९४, सोलापूर/पुणे : ९४२२७७४९३३, लातुर/बीड : ९४०३६९५८८९, नाशिक : ९४०३७७०६२५, सातारा : ९४२२७७४९३७, औरंगाबाद : ९४२२७७४९१२, नांदेड/हिंगोली : ९४०३०८०१०९, सांगली : ९४०३०८०१७२, नागपूर : ९४०३०८०१७१, नंदुरबार : ९४२२७७४९७५, फैजपूर : ९४०३६९५९०७, रावेर : ९४२२७७४९३१, मुक्ताईनगर : ९४०३६९५९०८